MHOS130000992026

**दिवाणी किरकोळ अर्ज/15/2026**
**सतीश प्रभाकर देशमुख वि. निरंक**
**निशाणी क्र.१ खाली आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार क्र. १ ते ५ यांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ च्या कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, मयत प्रभाकर जिवनराव देशमुख हे दिनांक २०/१०/२००८ रोजी मौजे भूम, ता. भूम, जि. धाराशिव येथे मयत झाले आहेत. मयत प्रभाकर जिवनराव देशमुख यांची पत्नी पुष्पाबाई प्रभाकर देशमुख (मयत दि. १०/०७/२००६), तसेच त्यांचा मुलगा चंद्रशेखर प्रभाकर देशमुख (मयत दि. ३०/०३/२०२५) व सून निर्मला चंद्रशेखर देशमुख (मयत दि. ११/०८/२०२५) हे पूर्वीच मयत झालेले आहेत. मयत प्रभाकर जिवनराव देशमुख यांना अर्जदार क्र. १ व २ हे मुले, अर्जदार क्र.३ व ४ ह्या मुली आणि अर्जदार क्र. ५ हा मयत मुलगा चंद्रशेखर याचा मुलगा (नातू) असे वारस असून, अर्जदारांशिवाय मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना मयताचे कायदेशीर वारस म्हणून ओळखण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

३. प्रस्तुत प्रकरणी, अर्जदारांच्या अर्जाच्या पुष्ट्यर्थ 'दैनिक संघर्ष' या वर्तमानपत्रामध्ये दिनांक ०४.०२.२०२६ रोजी जाहीर प्रगटन (नि.क्र.१०) प्रकाशित करून आक्षेप मागविण्यात आले. तसेच संबंधित नगर परिषद कार्यालय, तहसील कार्यालय आणि न्यायालयीन दैनिक नोटीस बोर्डवर जाहीरनामा गोषवारा बजावणी करण्यात आली.

४. अर्जदार क्र. १ यांनी अर्जाच्या पुष्ट्यर्थ स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र

(नि.क्र.११) वर दाखल केले आहे. त्यासोबतच कागदपत्रांच्या यादीसोबत (नि.क्र.९) मयत प्रभाकर जिवनराव देशमुख, पुष्पाबाई प्रभाकर देशमुख, चंद्रशेखर प्रभाकर देशमुख आणि निर्मला चंद्रशेखर देशमुख यांचे मृत्यू प्रमाणपत्रे, स्वयंघोषणापत्र व अर्जदारांच्या ओळखपत्रांच्या छायांकित प्रती दाखल केल्या आहेत. अर्जदारांनी नि.क्र.१२ वर पुरसिस देऊन पुरावा बंद केला आहे.

५. अर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एन. पी. बाबर यांचा युक्तिवाद ऐकला व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. सदरचा अर्ज निकाली काढतांना मयताचे कायदेशीर वारस कोण आहेत हे तपासणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने निशाणी क्र.११ वरील सरतपासातील शपथपत्राआधारे दाखल केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता, अर्जदाराने अर्जातील कथनांची पुनरावृत्ती करुन अर्जाला पुष्टी देणारा पुरावा दिलेला आहे. तसेच, कागदोपत्री पुराव्यामध्ये मयतांच्या मृत्यू प्रमाणपत्रांचे अवलोकन केले असता, मुख्य मयत प्रभाकर जिवनराव देशमुख हे दिनांक २०/१०/२००८ रोजी मयत झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्रावरून दिसून येते. तसेच अर्जदारांच्या मागणीबाबत दैनिक वर्तमानपत्रामधील जाहीर प्रगटन प्रसिद्ध करून अर्जावर आक्षेप मागविण्यात आला. परंतु, सदरचे जाहीर प्रगटन (नि.क्र.१०) प्रसिद्ध होऊनही अर्जदारांच्या मागणीबाबत मुदतीमध्ये कोणीही हरकत वा आक्षेप दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्जदारांचा पुरावा हा विनाआव्हाहनित राहिला आहे.

७. एकंदरीत, अभिलेखावर उपलब्ध असलेली कागदपत्रे व पुरावा यांचा विचार करता, मयत प्रभाकर जिवनराव देशमुख यांचे अर्जदार क्र. १ ते ५ हे मुले, मुली व नातू असल्याचे दिसून येते. तसेच अर्जदारांशिवाय मयतास इतर कोणीही

वारस नसून अर्जदार हे मयताचे वर नमूद नात्याने हिंदू वारसा कायदा, अनुसूची १ नुसार कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदारांच्या हक्कात त्यांच्या मागणीप्रमाणे वारस दाखला देण्यास कोणतीही कायदेशीर बाधा दिसून येत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

| **-: आ दे श :-** | |
|---|---|
| १. | अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २. | मयत **प्रभाकर जिवनराव देशमुख** यांचे १. सतिश प्रभाकर देशमुख, २. पांडुरंग प्रभाकर देशमुख, ३. मालती भ्र. मधुकरराव कुलकर्णी, ४. सौ. रोहिणी रमाकांत शेलमोहकर आणि ५. प्रसन्न चंद्रशेखर देशमुख हे कायदेशीर वारस आहेत असे घोषित करण्यात येते. |
| ३. | येणेप्रमाणे अर्जदारांना न्यायालयीन शुल्क भरलेनंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे. |

Note below heirship certificate as per Para 312 of Civil Manual :
" The person, to whom this certificate is granted, or his representative, is required, within six months from the date of this certificate, or within such further time as the Court may from time to time appoint, to exhibit in Court a full and true inventory of all the property and credits in his possession under this certificate, and also, within one year from the same date or within such further time as the Court may from time to time appoint, to render to the Court a true account of the said property and credits, showing the assets which have come to his hands and the manner in which they have been applied or disposed off."

---

MATE ASHLESHA SOUDAGAR
Digitally signed by MATE ASHLESHA SOUDAGAR Date: 2026.07.01 17:31:04 +0530

दिनांक : ०१.०७.२०२६ (**श्रीमती ए. एस. मते**)
ठिकाण : भूम. २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम.

---

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Shri. S. S. Hingmire, (Grade-III) |
| Court | :- | 2nd Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Bhoom |
| Date | :- | 01.07.2026 |
| Order signed by the Presiding officer on | :- | 01.07.2026 |
| Order uploaded on | :- | 01.07.2026 |